http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 4, April 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# ऊसशेती व साखर उद्योगाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांतून आलेले शेतकऱ्यांच्या शोषणाचे चित्रण



**- मा. मा. जाधव**
मराठी विभाग, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत,
जि. हिंगोली

## ABSTRACT

'कृषिमुलहि जीवनम्' कृषी हा मानवी जीवन व्यवस्थेचा पाया आहे. मानवी जीवनाचे मूळ कृषिप्रधान व्यवस्थेत आहे. ही आदिम स्वरूपाची संस्कृती म्हणून सांगितली जाते. कुणबी किंवा शेतकरी हा ग्रामीण समाजजीवनाचा प्रमुख घटक आहे. इतर व्यवस्था त्याला पुरक आहे. नव्या औद्योगिक धोरणामुळे आणि सामाजिक चळवळीमुळे बलुतेदारी मोडली. त्यांना पर्यायी धंदे मिळाले. परंतु, शेतीला पर्याय शोधता आला नाही. कुणब्याला शेती सोडवत नाही. त्याचे कारण हेच की, तो मातीला कवटाळून बसला आहे. त्याला दुसरा धंदा नाही. 'कृषिजीवन' हा ग्रामीण साहित्याचा महत्त्वाचा आधारघटक मानावा लागतो. सावकार शेतकऱ्यांचे शोषण करतात. भांडवलशाहीच्या युगात शेतकरी कंगाल होत असतो. ऊसदर शेतकरी जादा का मागतात? कारखाने परवडत नाही असे का म्हणतात? या प्रश्नाची उत्तरे अजून कोणालाही मिळाली नाहीत. साखरेचे दर वाढले की, ग्राहकांची ओरड आणि ऊसाला दर मिळत नाही म्हणून ऊस-उत्पादकांचे आंदोलन होते. अशा कात्रीत सहकारी साखर कारखानदार अडकला आहे. ऊसाला किमान वैधानिक किंमत मिळावी, ही मागणी शेतकरी संघटनांची असते.

 ©EIJMR All rights reserved.